ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

‘ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाविवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १९ पुणें, बुधवार तारीख २९ जुलै, १९५३ अंक १०

## विविध माहिती

**अमरनाथ क्रिकेट शिकविणार**—भारताच्या कसोटी सामन्यांत कप्तान असलेले प्रसिद्ध क्रिकेटपटु लाला अमरनाथ कानपूर येथें भारतीय क्रिकेट खेळाडूंना खेळ शिकविण्यासाठीं एक शाळा काढणार असल्याचें समजतें. शाळा १५ सप्टेंबरपासून सुरू होण्याचा संभव आहे. त्यांना इतर क्रिकेटपटूंनीं मदत करण्याचें कबूल केलें आहे.

**अमेरिकेंत चहाचा वाढता खप**—अमेरिकेंत चहाचा खप उत्तरोत्तर अधिकाधिक वाढूं लागला आहे. १९५२ च्या मार्च अखेर संपलेल्या वर्षात त्याच्या मागील वर्षापेक्षा चहाच्या खपांत ११ टक्क्यांनीं वाढ झाली. गेल्या आर्थिक वर्षात अमेरिकेनें ९,९०,००,००० पौंड चहा आयात केला. त्या मागील आर्थिक वर्षात ८,४०,००,००० पौंड चहा आयात करण्यांत आला होता.

**भांगेवर कर**—सौराष्ट्रांत भांग, गांज्या आणि अफू ह्यांच्या विक्रीवर दर रुपयामागें अर्धा आणा कर घेण्यांत येणार आहे. ज्या आयात व्यापाऱ्यांची विक्री अगर आयात १०,००० रुपयांपेक्षा अधिक असेल त्यांना हा कर द्यावा लागेल. त्याचप्रमाणें, ज्यांच्या उलाढाली २०,००० रुपयांपेक्षा अधिक असतील अशा इतर व्यापाऱ्यांनाहि तो द्यावा लागेल.

**अन्नांतील भेसळ थांबविण्यासाठी**—गेल्या एप्रिल महिन्यांत अन्नपदार्थांतील भेसळ थांबविण्यासाठीं लखनौ शहरांत ५०९ खटले भरण्यांत आले आणि ३९५ जणांना शिक्षा करण्यांत आल्या. खटल्यांत करण्यांत आलेल्या दंडाच्या रूपानें २८,४९५ रुपये वसूल करण्यांत आले. फक्त दोन गुन्हेगारांना सक्तमजुरीची शिक्षा देण्यांत आली.

**जपानी कुटुंबें ब्राझिलला जाणार**—ब्राझिल आणि जपान ह्यांच्या दरम्यान करण्यांत आलेल्या पंचवार्षिक कराराप्रमाणें ब्राझिलच्या सरकारनें ६९० जपानी कुटुंबांना आपल्या देशांत स्थानिक होऊं देण्याचें कबूल केलें होतें. परंतु आतां ९,००० जपानी कुटुंबांना अशी परवानगी देण्याचें कबूल करण्यांत आलें आहे असें समजतें. जपानच्या वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न कमी तीव्र करण्याचा हा एक मार्ग आहे.

**पौर्णिमेला झोपेंत चालणारी स्त्री**—ओक्लाहामा संस्थानमधील एनिड ह्या गांवच्या पोलिसांच्या मागें एक विलक्षण साडेसाती लागली आहे. ह्या गांवांत २७ वर्षांची एक तरुण व सुंदर स्त्री आहे. पौर्णिमेच्या रात्रीं ती झोपेंत चालूं लागते. अशाच एका पौर्णिमेच्या दिवशीं ती एका झाडावर चढली. अर्थात् तिच्या मागोमाग तिच्या यजमानांनाहि झाडावर चढावें लागलें. तिला जागे केल्यावर मग दोघांनीं खालीं धरलेल्या जाळ्यांत उड्या घेतल्या. दर पौर्णिमेला पोलिसांना ह्यासाठी दक्ष असावें लागतें.

**सूडानने रशिअन कापड घेणार**—सूडानमधील आयात-व्यापाऱ्यांनीं रशिआकडून बरेंच कापड आयात करण्याचें ठरविलें आहे. रशिआकडून मिळणारें कापड स्वस्त असतें आणि तें लवकर मिळूं शकतें, ह्या दोन कारणांसाठी ही आयात करण्यांत येत आहे, असें समजतें.

**मुंबई ते दिल्ली नवा रस्ता**—मुंबई ते दिल्लीपर्यंत एक नवा रस्ता तयार करण्याचा भारतीय सरकार विचार करीत आहे असें समजतें. हा रस्ता अहमदाबाद, उदयपूर, अजमीर व जयपूर असा काढण्यांत येणार असून त्यासाठी ४ कोटी रुपये खर्च येईल. रस्त्याचा विशेष असा कीं, तो कोठल्याहि ऋतूंत वापरतां येईल. त्यासाठी जरूर त्या ठिकाणीं मोठे पूलहि बांधण्यांत येणार आहेत.

**नागपूरच्या सरकारवर टंकलेखनिकेचा दावा**—नागपूर सरकारच्या कचेरींतील टंकलेखनिका कु. रेड्डी ह्यांनीं व त्यांच्या पित्यानें मिळून सरकारवर ३ लाख रुपयांच्या नुकसानभरपाईचा दावा लावला आहे. सध्यां नागपूर येथें रेल्वेच्या ज्या कचेऱ्या आहेत, त्यांची जागा १८९० सालीं आपल्या पूर्वजांकडून पूर्ण नुकसानभरपाई न देतां सरकारनें घेतली आहे, असें बापलेकींचें म्हणणें आहे.


**सो. रशिआचें आर्थिक सामर्थ्य**—अमेरिकन सरकारचे दुय्यम आर्थिक चिटणीस मि. वॉघ ह्यांनीं असा अंदाज केला आहे कीं १९६० अखेर रशिआचें आर्थिक सामर्थ्य प. युरोपच्या आर्थिक सामर्थ्यापेक्षाहि अधिक होईल. ते पुढें म्हणाले कीं, दुसरें महायुद्ध संपल्यापासून रशिआनें केलेली प्रगति लक्षांत भरण्यासारखी आणि अमेरिकन लोकांना नाउमेद करण्यासारखी आहे.

**‘ मीन कॉम्फ ’ ला ४ हजार पौंड कोणी देईना**— हिटलर आपल्याविषयींच्या निष्ठेची शपथ ‘मीन कॉम्फ’च्या ज्या प्रतीच्या आधारानें घेववीत असे त्या प्रतीचा लंडन येथें लिलांव करण्यांत येत असतां लिलांववाल्यानें किमान ४,००० पौंड किंमत जाहीर केली होती. पण इतकी किंमत देणारें गिऱ्हाइक लिलावांत न बोलल्यामुळें हा सौदा रद्द करण्यांत आला.

**सहकारी बँकेला भांडवल**—हैद्राबाद सरकारनें हैद्राबाद डोमिनिअन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या भांडवलापैकीं २ लाख रुपयांचें भांडवल घेऊन आपले ५ लाख रुपये देण्याचें आश्वासन पुरें केलें आहे. शेतीचीं कामें अडून राहूं नयेत म्हणून शेतकऱ्यांना अल्पमुदतीचीं कर्जें देण्यासाठी हैद्राबाद सरकारनें भांडवल पुरवावें अशी सूचना रिझर्व्ह बँकेनें केली होती. त्या सूचनेस अनुसरून हा व्यवहार करण्यांत आला आहे.

# टाटा ॲग्रिको हत्यारें

तुमचे हातात कोणतेही काम असूद्या त्याकरितां ॲग्रिको हेंच योग्य हत्यार आहे, अधिक कार्बनयुक्त पोलादाची केलेली ॲग्रिको हत्यारें मुख्यता मजबूत व टिकाऊ आहेत आणि तुम्हाला पुष्कल दिवस चांगलेकाम देतील.




वेस्ट इन्डिया फावडे

प्रत्येक लागवडीचे कामाला...

## ॲग्रिको

हें च उत्त र



दोन तोडे असलेली मोठी हातौडी



अष्टपैलूदार शवरी



सिनी आणि टोकदार कुदल

मुंबई फावडे

दि टाटा आयर्न ॲन्ड स्टील कंपनी लिमिटेड
सेल्स ऑफीस :
२३ बी, नेताजी सुभाष रोड, कलकत्ता – १
शाखा : मुंबई, मद्रास, नागपुर, अहमदाबाद, सिकंदराबाद, विजयानगरम छावणी, जलंदर छावणी आणि कानपूर.

AG.3417

# अर्थ

बुधवार, ता. १९ जुलै, १९५१



संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## उधारीचा विमा ( क्रेडिट इन्शुअरन्स )

कारखानदार माल तयार करतात, त्याची किंमत खरेदीदार गिऱ्हाइकानें देऊन कारखानदाराचे प्रत्यक्ष पदरांत पडण्यास बराच वेळ लागतो. दोहोंचे मधें कित्येक महिन्यांचा अवधी असतो. कारखानदारानें विकलेल्या मालाची रकम सर्वच्या सर्व वसूल होत नाहीं; कांहीं बुडवणारीं कुळें भेटतातच. अशा किती रकमा बुडतात, ह्याचा हिशेब ठेवतां येऊन त्याविषयीं आगाऊ अंदाज बांधणेंहि शक्य असतें. मृत्यूबद्दल किंवा आगीबद्दल आगाऊ अंदाज सर्वसाधारण करून, त्यांच्या विम्याची व्यवस्था करणें सर्वत्र रूढ झालेलें आहे. बुडीत उधारीच्या धोक्याचा असाच बंदोबस्त करतां येणार नाहीं काय ?

उधारीच्या विम्यास ग्रेटब्रिटनमध्यें १८९० च्या सुमारास प्रारंभ झाला. ऑस्ट्रेलियाकडे ग्रेटब्रिटनमधून माल निर्गत होई, त्यासंबंधांत बऱ्याच अडचणी भासूं लागल्या. ऑस्ट्रेलियांतील पिकांचें झालेलें नुकसान, सोडतींचे व्यवहार व त्यामुळें वाजलेलीं दिवाळीं, ह्यामुळें ब्रिटिश व्यापाऱ्यांत घबराट निर्माण झाली. उधारीच्या धोक्याचा विमा उतरविणाऱ्या कंपन्या त्या सुमारास ग्रेटब्रिटनमध्यें स्थापन झाल्या.

ज्या उधारीच्या व्यवहारांत धोका ज्यास्त, अशा धोक्यांसाठीच पॉलिसी मागितल्या व दिल्या जाऊं लागल्या. कंपन्या सबंध नुकसानीची जोखीम पत्करूं लागल्या, त्या कारणानें विम्याचा फायदा घेणाऱ्या फर्म्स भरमसाट व्यापार वाढवून अगदीं नालायक गिऱ्हाइकांसहि, विमाकंपनी नुकसानभरपाई करीलच, ह्या खात्रीनें माल विकूं लागल्या. त्याचा व्हावयाचा तोच परिणाम झाला, आणि उधारीच्या विम्याचा व्यवसाय पुनः भक्कम पायावर सुरू होण्यास अवधी लागला. उधारीचा विमा दोन मूलग्राहि तत्त्वांवर आधारला पाहिजे हें स्पष्ट झालें:- (१) कांहीं निवडक ( म्हणजे विमेदाराचीं नापत गिऱ्हाइकें ) धोक्यांची जबाबदारी न पत्करणें; सरासरी धोक्याच्या सिद्धांतास वाव देणें; म्हणजेच विमेदार फर्मच्या सर्वच व्यवहाराचा विमा पत्करणें. (२) उधारी बुडण्याच्या धोक्याचा कांहीं अंश विमेदार-फर्मलाच पत्करण्यास लावणें. ह्यामुळें, विमेदार फर्मला भरमसाट व्यवहार करण्याला प्रोत्साहन उरलें नाहीं; उलट स्वतःची गिऱ्हाइकें निवडतांना विचार केला पाहिजे आणि वसुलीची खटपट केली पाहिजे ह्याची जाणीव करून मिळाली. १८९४ सालीं स्थापन झालेल्या एक्सेस इन्शुअरन्स कंपनीनें वरील तत्त्वांचा अवलंब केला; पुढें तिचें उधारीच्या विम्याचें काम ट्रेड इंडेम्निटी कंपनीनें स्वतःकडे घेतलें. हीच कंपनी आतां हा व्यवसाय करणारी ग्रेटब्रिटनमधील प्रमुख संस्था आहे; तिच्या भांडवलापैकीं कांहीं भाग कांहीं मोठ्या ब्रिटिश कंपन्यांनीं पुरविलेला आहे.

उधारीचा विमा पत्करणारी अमेरिकेंतील पहिली कंपनी १८९३ मध्यें स्थापन झाली आहे. सबंद जगांतील हीच पहिली क्रेडिट इन्शुअरन्स कंपनी असून तिचें नांव अमेरिकन क्रेडिट इंडेम्निटी कंपनी ऑफ बाल्टिमोर असें आहे. जर्मनी, फ्रान्स, स्वित्झरलंड, नेदरलंड्स, बेल्जम, स्पेन, इटली, चेकोस्लोव्हाकिया, इत्यादि युरोपांतील देशांतहि अशा क्रेडिट कंपन्या स्थापन झाल्या. ह्यांतील बहुतेक कंपन्या भांडवल, संचालक, इत्यादींच्या रूपानें एकमेकाशीं निगडित आहेत व त्यांची एकमेकाशीं री-इन्शुअरन्सची व्यवस्था आहे. क्रेडिट इन्शुअरन्सच्या व्यवहाराचीं तत्त्वें आतां ह्या सर्वच कंपन्यांतून सारखींच पाळलीं जातात; सवलती व सोई ह्या बाबतींत वैचित्र्य आढळतें व तें स्वाभाविकच आहे.

खरेदीदाराची दिवाळखोरी किंवा दीर्घ काळ त्यानें रकम न देणें, ह्याची जोखीम विमाकंपनी पत्करते आणि ह्या जोखमीचा कांहीं भाग विमेदारफर्मलाहि पत्करावा लागतो. विमा कंपनीच्या पॉलिसी दोन प्रकारच्या असतातः एका पॉलिसीप्रमाणें, फर्म विमा कंपनीकडे तिच्या सर्वच व्यवहाराचा विमा उतरते. दुसऱ्या पॉलिसीप्रमाणें, फर्मच्या फक्त कांहीं व्यवहारांचा किंवा तिच्या एखाद्या विशिष्ट व्यवहाराचाच विमा उतरविला जातो. पहिल्या प्रकारची "होल टर्न-ओव्हरची" पॉलिसी विमा कंपन्या ज्यास्त पसंत करतात; कारण त्यांत विम्याच्या खऱ्या तत्त्वास—धोक्याची सरासरी काढणें—पूर्ण वाव मिळतो. सहाजिकच, अशा विम्यांचे हप्ते (सामान्यतः हजारीं १ ) दुसऱ्या प्रकारच्या विम्यांच्या हप्त्यापेक्षा ( सामान्यतः शेकडा १ ) कमी असतात. गेल्या कांहीं वर्षांत क्रेडिट इन्शुरन्सचा प्रसार पुष्कळच झाला आहे. १९५२ सालीं ग्रेटब्रिटनमध्यें ट्रेड इंडेम्निटी कंपनीनें सुमारें ९३० कोटी रुपयांची जोखीम पत्करली व हप्त्यांचें उत्पन्न १६५ कोटी रु. झालें. सरकारी एक्सपोर्ट गॅरंटी खात्यानेंहि ७५० कोटी रुपयांच्या व्यवहाराची हमी घेतली होती; म्हणजे सुमारें १,६८० कोटी रुपयांच्या व्यवहारास कोणत्याना कोणत्या स्वरूपाचें संरक्षण होतें. पश्चिम युरोपांतील तत्सम रकम ३,००० कोटी रु. असावी असा अंदाज आहे. ह्या व्यवहारांत तेथील राज्यांचीं सरकारें व खासगी कंपन्या ह्यांचें प्रभावी सहकार्य आढळून येतें.

क्रेडिट इन्शुअरन्सच्या सोईचें बँकांच्या दृष्टीनें मोठें महत्त्व आहे, कारण कारखानदारांकडून कर्जास किंवा हुंड्यांच्या डिस्कौंटला आणखी तारण म्हणून ह्या विमापॉलिसी बँका घेऊं शकतात. क्रेडिट इन्शुअरन्स पॉलिसी सबंदच्या सबंद बँकेला लिहून देतां येते, किंवा इन्शुअरन्स कंपनीची लेखी गॅरंटी ("कर्ज किंवा डिस्कौंट केलेल्या हुंडीच्या स्वरूपांत कारखानदारानें घेतलेल्या रकमेचा, विम्याचे प्रमाणांतील भाग विमाकंपनी बँकेला देईल." ) बँकेस कर्जदार मिळवून देतो. ह्या दोन्ही पद्धतींनीं बँकांना आतां ज्यास्त तारण मिळण्याची सोय झाली आहे. विमेदारांनाहि, केवळ त्यांचेजवळ क्रेडिट इन्शुअरन्स पॉलिसी आहे म्हणून, बँकेकडून कर्जाच्या बाबतींत ज्यास्त सवलती मिळूं शकतात. विमाकंपनीला हप्ते द्यावयाचे, त्यांची अशारीतीनें सहज भरपाई होऊं शकते.

इंटरनॅशनल क्रेडिट इन्शुअरन्सचा रौप्यमहोत्सव मे, १९५१

मध्यें नुकताच साजरा झाला, तेव्हां एका वक्त्यानें पतपद्धतींतील हुंड्यांच्या बरोबरीचें स्थान क्रेडिट इन्शुअरन्सला दिलें. हुंड्यांची पद्धति अगदी जुनी, तर उधारीच्या विम्याची पद्धति अगदी नवीन आहे. परंतु, दोघोंची उत्कृष्ट तुलना करता येण्याजोगी आहे. हुंड्यांच्या पद्धतीची पुरेशी वाढ भारतांत अद्याप झालेली नाहीं, ही आपल्या आर्थिक व्यवहारांतील मोठीच उणीव आहे. ती दूर करण्याचे रिझर्व्ह बँकेचे प्रयत्न चालू आहेत. परंतु, त्या बाबतींत प्रगति म्हणण्याजोगी झालेली नाहीं. बिल मार्केटच्या अभावीं, कारखानदार किंवा व्यापारी ह्यांची त्यांच्या मालविक्रीची रक्कम हातीं येईपर्यंत कुचंबणा होते; मालाच्या आधारावर हुंड्या काढण्याची व त्या डिस्कौंट करण्याची पद्धति रूढ झाली तर त्यांना सहजीं भांडवल मिळूं शकेल व बँकांनाहि रकमा गुंतविण्यास सोईस्कर साधन उपलब्ध होईल. उधारीच्या विम्याचा आपलेकडे प्रसार तर राहोच, पण त्याचा परिचयहि झालेला नाहीं. व्यवहारपद्धति सुधारून, पतीच्या साधनांचा फायदा घेण्यासारखी तिची पातळी सर्वत्र उच्च राखली तरच कारखानदारांस व व्यापारास बँकांचा खरा उपयोग होऊं शकेल; त्यांचीं कर्जें आर्थिक व्यवसाय सुसूत्र चालू ठेऊं शकतील. बँकांनीं कर्जें देण्याजोगी परिस्थिति निर्माण करणें हें कारखानदार व व्यापारी ह्यांचें काम आहे; बँकांचेंहि त्यांत हित आहे. परंतु पुढाकार त्यांनीं घेतला तरी त्यास यश येणें दुसऱ्या बाजूवरच अवलंबून राहील.

---

## वैभव

### कै. शेठ वालचंद स्मृति-अंक

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे संस्थापक व आंतरराष्ट्रीय कीर्तीचे महाराष्ट्रीय उद्योगपती शेठ वालचंद हिराचंद ह्यांना श्रद्धांजलि अर्पण करण्यासाठीं व त्यांचा गुणगौरव करण्यासाठीं चेंबरनें आपल्या मासिक मुखपत्राचा जुलै, १९५१ चा अंक विशेषांक म्हणून प्रसिद्ध केला आहे. कै. शेठ वालचंद ह्यांच्या कामगिरीचें, आणि त्यांच्या अंगच्या विविध गुणांचें धावतें दर्शन घडवून आणण्याची कामगिरी त्यांच्या निकटवर्ती व्यक्तींनीं उत्कृष्ट रीतीनें पार पाडली आहे. श्री. म. ल. डहाणूकर, शेटजींचे सॉलिसिटर श्री. गोरेगांवकर, चेंबरचे प्रारंभीपासूनचे सेक्रेटरी श्री. द. वि. केळकर, श्री. शंकरराव किर्लोस्कर, श्री. कृ. ह. ढमढेरे, प्रा. अळतेकर, शेटजींचे सुमारें ३५ वर्षे सेक्रेटरी असलेले श्री. बी. डी. सरदेसाई, श्री. गं. वि. पुराणिक, इत्यादींचे मराठी लेख प्रस्तुत विशेषांकांत देण्यांत आले आहेत. त्यांतील माहितीवरून शेटजींच्या व्यक्तित्वाची उत्कृष्ट कल्पना येते. फेडरेशनचे अध्यक्ष श्री. सरय्या, श्री. वैकुंठराय मेहता, पूर्वीचे डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज श्री. बी. पी. अडवाणी, श्री. एम्. ए. मास्टर, श्री. प्राणलाल देवकरण नानजी, श्री. तुलसीदास किलाचंद, इत्यादि त्यांच्या सहकारी उद्योगपतींचे व चहात्यांचे इंग्रजी लेखहि देण्यांत आले आहेत. त्यांतील श्री. एम्. ए. मास्टर ह्यांचा विस्तृत लेख विशेष बोधप्रद आहे. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष, श्री. कृ. ह. कब्बूर, ह्यांनीं विशेषांकास प्रस्तावना लिहिली आहे. शेठ वालचंद स्मृतिअंक शेटजींच्या कर्तृत्वास व लौकिकास साजेल, असाच काढल्याबद्दल मासिकाची सल्लागारसमति व संपादक ह्यांचें अभिनंदन केलें पाहिजे.

---

**बनारसमध्यें संस्कृत विद्यापीठ**—उत्तर प्रदेश सरकारनें बनारस येथें एक संस्कृत विद्यापीठ काढण्याचें ठरविलें आहे असें समजतें. सध्याच्या बनारस संस्कृत कॉलेजचेंच विद्यापीठांत रूपांतर करण्यांत येणार आहे. विद्यापीठ अस्तित्वांत आल्यावर उत्तर प्रदेशांतील विद्यापीठांची संख्या सात होईल.

## जागतिक शेती—उत्पादन परिषद

गेल्या जूनच्या दुसऱ्या आठवड्यांत इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ ॲग्रिकल्चरल प्रोड्यूसर्स ह्या संस्थेचें ६ वें अधिवेशन रोम येथें भरलें होतें. निरनिराळ्या तीस देशांच्या सुमारें २०० प्रतिनिधींनीं अधिवेशनांत भाग घेतला होता. भारतातर्फे हैद्राबाद सरकारचे शेतकी–मंत्री श्री. चन्ना रेड्डी आणि उत्तर प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे एक सभासद श्री. एस्. एम्. वही हे हजर होते.

श्री. वही ह्यांनीं परिषदेंत झालेल्या कामकाजासंबंधीं पाटणा येथील वृत्तपत्रप्रतिनिधींनीं पुढीलप्रमाणें माहिती निवेदन केली. श्री. वही म्हणाले कीं, परिषदेनें जगांतील आर्थिक परिस्थितीचा, विशेषतः शेतीविषयक परिस्थितीचा आढावा घेतला. ह्या विषयासंबंधीं परिषदेंत असें मत व्यक्त करण्यांत आलें, कीं जगाची सध्याची आर्थिक आणि अन्नविषयक स्थिति समाधानकारक नाहीं; इतकेंच नव्हे तर ह्या परिस्थितींत आणखी मोठा बिघाड होण्याचा संभव आहे. अविकसित देशांना देण्यांत येणारी आर्थिक मदत, युरोपच्या आर्थिक पुनरुद्धाराचा आढावा, जमीनविषयक सुधारणा, शेतीचें उत्पादन व व्यापार, इत्यादि विषयांचाहि तपशीलवार विचार करण्यांत आला. परिषदेला उपस्थित असलेल्या निरनिराळ्या देशांच्या प्रतिनिधींनीं आपआपल्या देशांतील प्रमुख मालाच्या उत्पादनासंबंधीं स्वतंत्र अहवालहि सादर केले. साखर, गहूं, कापूस, डेअरींतील उत्पादन, अंडीं, ताग, इत्यादि मालासंबंधीं असे अहवाल करण्यांत आले.

किंमतींची स्थिरता राखण्यासंबंधीं सर्वच देशांच्या प्रतिनिधींनीं एकमत व्यक्त केलें. हा उद्देश साध्य होण्यासाठीं तीन सूचना करण्यांत आल्याः–(१) राष्ट्रांनीं विवक्षित मालाच्या किंमतीच्या बाबतींत करार करावे, (२) वरकड असलेल्या मालाची वांटणी आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी असलेल्या एखाद्या संस्थेतर्फे करण्यांत यावी आणि (३) अडीअडचणींच्या वेळीं उपयोगी पडावे म्हणून मालाचे सांठे करण्यांत यावेत आणि त्यांचा योग्य उपयोग करण्यांत यावा. शिफारसी करण्यांत सर्व प्रतिनिधी अशा प्रकारें एका भूमिकेवर आले असले तरी सद्यःपरिस्थितीकडे लक्ष वेधण्याचें काम फेडरेशनचे अध्यक्ष मि. अरे मार्टिन ह्यांनीं उत्तम तऱ्हेनें पार पाडलें. ते म्हणाले, कीं व्यापारांत समतोलता राखण्याच्या बाबतींत देशोदेशींच्या सरकारांनीं सहकार्य केलेलें दिसत नाहीं. त्यामुळें ह्या बाबतींत पदरीं निराशाच येत आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या प्रवाहांत सुरळीतपणा न आल्यामुळें निरनिराळ्या देशांच्या आर्थिक धोरणांत आर्थिक राष्ट्रवादाचा पुन्हा जोरानें उदय होत आहे. कांहीं देशांतून कांहीं माल इतका सांठून राहूं लागला आहे, कीं त्यामुळें भयप्रद परिस्थिति निर्माण झाली आहे. आर्थिक राष्ट्रवाद नाहींसा झाला आहे असें समजण्यांत येतें. पण तसा तो झालेला नसल्यामुळेंच वरील परिस्थिति निर्माण झाली आहे. निरनिराळ्या देशांतील सरकारांच्या प्रचारामुळें शेतीचें उत्पादन करणारा वर्ग अन्नधान्याचें उत्पादन वाढवीत आहे. पण ह्या अधिक उत्पन्न होणाऱ्या मालाला बाजारपेठेची आवश्यकता आहे. अशी बाजारपेठ न मिळाल्यास सरकारला शेतीच्या मालाच्या किंमती कृत्रिम रीत्या राखाव्या लागतील. नाहींतर त्या घसरगुंडीला लागण्याचा धोका असतो.

## "कापडावरील नियंत्रणें (भाव व विक्री) उठलीं", "पुढें काय?"

लेखकः—ग. कृ. चितळे, बी. कॉम्., पुणें–पार्लें (मुंबई २४).

तारीख दहा जुलैला दिल्लीहून घोषणा झाली कीं, कापड गिरण्यांवरील, "किंमत व वाटप," याबाबतचीं राहिलेलीं नियंत्रणें काढून घेण्यांत आलीं. याअगोदर आक्टोबरपासून नियंत्रणें सैल करण्यांत येत होतीं, तथापि अजून उत्पादन नियंत्रणें चालू आहेत. लवकरच तींहि उठविण्यांत येतील असा कयास आहे.

पंचवार्षिक योजनेंत, गिरण्यांचें उत्पादन १९५५–५६ सालापर्यंत ४८० कोटी वारावर आणावें असें ठरविलें होतें. पण या वर्षातील (१९५२) सरासरी मासिक उत्पादन ४० कोटी वारावर गेलें आहे, असें दिसून आल्यावरून सरकारनें कापडाचे भाव व कापडाचें वाटप यावरील उरलीं–सुरलीं नियंत्रणें रद्द केलीं. कापडाचें उत्पादन १९४८ सालीं ४३१ कोटी वार झालें, १९४९ मध्यें ३९० कोटी वार, १९५० सालीं ३६६ कोटी वार व १९५१ मध्यें ४०७ कोटी वार झालें असें पंचवार्षिक योजनेंत नमूद केलेलें आहे. त्यावरून सध्याचें १९५२ मधील उत्पादन समाधानकारक असल्याचें दिसून येतें. म्हणून येपुढें कापडाची टंचाई भासणार नाहीं अशी अपेक्षा आहे. तथापि उत्पादन घटल्यास सरकार पुन्हा नियंत्रणें आणील असें सरकारी घोषणेंत म्हटलें आहे.

निर्नियंत्रणाबाबत सर्वत्र समाधान व्यक्त केलें गेलें व मालकांकडून, उत्पादनावरील नियंत्रणें काढून द्यावीं अशी मागणी करण्यांत येत आहे. मजुरांच्या पुढाऱ्यांचा यास विरोध आहे. त्यांचे मतें, कांहीं गिरणिवाले टिकाऊ कापड काढणार नाहींत. सरकार काय करणार हें पहावें.

सध्या मागणीपेक्षां पुरवठा जास्त आहे; लोकांची सांपत्तिक स्थिति खालावलेली आहे; राहणीचा खर्च सारखा वाढत आहे; त्यामुळें कापडखरेदीस बहुजनसमाज थोडीफार कात्री लावत आहे; नको असलेल्या कापडाचा सांठा तोटा खाऊन गिरणीवाले विकत आहेत; वगैरे कारणांमुळें व या दोन महिन्यांत नेहमींच खरेदी कमी त्यामुळें सध्या कापडाचे भाव व सुताचे भाव थोडेफार उतरले. पण श्रावण भाद्रपदापासून खरेदी सुरू होईल त्यावेळीं भाव थोडेफार वाढतील अशी घाऊक व्यापाऱ्यांची अपेक्षा आहे. त्याचप्रमाणें बहुतेक सर्व गिरणीवाले, लोकांना आवडेल, घ्यावयास परवडेल व टिकाऊ असेल असेंच कापड काढतील असें वाटतें; पण तें सध्यापेक्षा स्वस्त असेल का?

कापसाचे भाव टिकून आहेत, मजुरीचा खर्च व स्टोअर्स, पार्टस, केमिकल्स, वगैरेचे भाव थोडेफार वाढतच आहेत. त्यामुळें सध्यापेक्षा कमी भावानें माल देणें मालकांना परवडणार नाहीं. कांहीं ठराविक गिरण्यांच्या मालाला–जो खात्रीचा माल समजला जातो अशा मालाला–पहिल्याप्रथम गिऱ्हाईक मिळेल व अशा गिरण्या फायदा करूं शकतील.

पण साडेचारशेंपैकी, सुमारें दीडशें गिरण्या, एकतर त्या फार लहान म्हणून "अन्‌एकॉनॉमिक युनिट्स" आहेत, किंवा त्यांना जुन्या मशिनरींमुळें उत्पादन कमी निघतें त्यामुळें उत्पादन–खर्च जास्त येतो त्यामुळें, चढाओढींत टिकणें कठीण होणार आहे. अशा दीडशें गिरण्यापुढें कठीण प्रसंग येणार आहे, व त्यांना एव्हांपासून आपलें घर सुधारण्याच्या कामास लागलें पाहिजे. तसें त्यांना करतां आलें नाहीं तर गिरण्या बंद कराव्या लागतील. टाईम्सकार सुचवितात कीं, उत्पादन–खर्च कसा कमी होईल याकडे सरकारनें लक्ष द्यावें. हें तर खरेंच, पण तेवढें करतां येईल कां? व दुसरें, तेवढ्यानें लहान व जुन्या गिरण्यांची परिस्थिति सुधारेल कां? वरील दीडशें गिरण्यांचा प्रश्न सहा महिन्यांतच हाताळावा लागेल. त्यांची सुधारणा करून त्या चालू राहिल्यासच सध्याचें ४० कोटी वाराचें उत्पादन टिकेल व पंचवार्षिक योजनेंतील ध्येय साध्य होईल.

ही परिस्थिति सरकारला माहीत असेलच व त्याबाबत सरकार व त्यांना सल्ला देणाऱ्या कमिट्या यावर विचार करीत असतील. या लेखकाचे मतें या दीडशें गिरण्यांच्या कारभारांत सुधारणा होणें जरूर आहे, व तसें करावयाचें झाल्यास त्याबाबत खालील सूचना पुढें मांडीत आहे. त्याकडे सरकारनें, अशा गिरणीमालकांनीं व गिरण्यांच्या शेअर होल्डर्सनीं लक्ष द्यावें.

(१) पहिल्याप्रथम, सरकारनें स्पेशल (खास) अधिकार घेऊन या दीडशें गिरण्यांची, अनुभवी तज्ज्ञांकडून, "मशिनरी व मॅनेजमेंट" याबाबत संपूर्ण तपासणी करावी, व प्रत्येक गिरणीबाबतच्या तज्ज्ञांचा रिपोर्टाची एकेक प्रत त्या त्या गिरणीचे शेअरहोल्डर्सना द्यावी व त्यांना आपलें कामकाज सुधारण्यास एकदा अवसर द्यावा. त्यासाठी अशा गिरण्यांना आपले भांडवलाची पुनर्रचना करावी लागेल. त्याबाबत तज्ज्ञांनीं सल्ला द्यावा. बहुतेक सर्व गिरण्यांनीं, जुन्या फंडांतून "बोनस" शेअर्स दिले, ते रद्द करून, भांडवलाचा बोजा कमी करावा, व नंतर गिरणीच्या मशिनरींचे स्थितीप्रमाणें, सरकारनें, इन्डस्ट्रिअल फायनान्स कॉरपोरेशनकडून, कांहीं अटींवर, डिबेंचर लोन द्यावें. अर्थात् दैनंदिन कारभारांत कॉर्पोरेशन हस्तक्षेप करूं शकणार नाहीं. पण कंपनीचा कारभार व्यवस्थित चालू आहे, योग्य भावांत मशिनरी खरेदी होत आहे व ती गिरणींत बसविली जात आहे, वगैरे महत्त्वाच्या गोष्टीकडे कार्पोरेशननें नेमलेल्या डायरेक्टरना लक्ष देता येईल व त्या कारभारावर पहाणी करतां येईल. एक्सपर्टचा रिपोर्ट प्रत्येक शेअर होल्डरला दिल्यामुळें, त्यांना त्याबाबत एजन्टना जाब विचारतां येईल. मागें अमाप जरी नाहीं, तरी भरगच्च डिव्हिडंड शेअर-होल्डर्सना मिळालेले आहे. शिवाय बोनस शेअर्स मिळालेले आहेत. तेव्हां बोनस शेअर्सइतकी रक्कम सोडून देण्यास हरकत नाहीं. (नाहींतर पुढें सर्वच जावयाचे.) डिबेंचर्स फेडल्यावर, नफ्याचे भांडवलाशीं प्रमाण समाधानकारक राहील, व सध्याच्या त्यागाची भरपाई होईल. डिबेंचर डायरेक्टरर्स स्वतंत्र असल्यामुळें त्यांना गिरणीचे कारभारावर दक्षतेनें देखरेख करतां येईल व या सर्वांचा परिणाम गिरणीचें कामकाज फायदेशीर होण्यांत होईल. असें कर्ज दिल्यास कंपनीचे ऑडिटर–बरोबर कॉर्पोरेशननें आपला, कारपोरेशनला जबाबदार असा, ऑडिटर नेमावा.

(२) वरीलप्रमाणें व्यवस्था करणें शक्य नसल्यास, सरकारनें अशा गिरण्यांचे हिशोब तपासून, योग्य किंमत ठरवून मग त्या स्वतः चालवाव्यात किंवा एखाद्या भरपूर भांडवलवाल्या अनुभवी गिरणीमालकांना कांहीं अटींवर चालविण्यास द्याव्यात.

(३) अशा गिरण्यांत चालू असलेली मॅनेजिंग एजन्सी रद्द करून, त्यांच्या बोर्डला गिरणी चालविण्याची जबाबदारी घेणें भाग पाडावें व अशा गिरण्यांचा कारभार, अनुभवी इन्स्पेक्टर्स किंवा सल्लागार कमिटीकडून सहा सहा महिन्यांनीं तपासून, चांगल्या गिरण्यांच्या कारभाराशीं ताडून पहावा; तरच त्या

चांगल्या रीतीनें चालू शकतील. तज्ज्ञांचा सल्ला, थोडीफार फी घेऊन, त्यांना मिळावा व या सर्व रिपोर्टांच्या प्रति शेअर-होल्डर्सना व जनतेला मिळाव्यात म्हणजे योग्य तें दडपण येऊन कारभार सुधारेल.

जे अन्‌एकानामिक युनिटस आहेत, ते एकतर वाढवून घावेत, किंवा अशा दोनचार युनिटांचें एकत्रीकरण करावें. अजिबात बंद पडण्यापेक्षा असें एकत्रीकरण, थोडाफार त्याग व झीज सोसून करणें अंतीं हितावह होईल. या सूचनांकडे सरकारचें व शेअरहोल्डर्सचें व मॅनेजमेंटचें लक्ष वेधणें जरूर आहे.

आतां कंट्रोल उठल्यामुळें कापड स्वस्त होईल अशी जनतेनें आशा करूं नये. त्यासाठी मालकांनीं खूप विचार करून उत्पादन केलें पाहिजे. त्याचप्रमाणें जनतेच्या, विशेषतः मध्यम-वर्गीयांच्या खरेदी-शक्तींत सुधारणा व्हावयास पाहिजे. लोकांना पाहिजे असा व टिकाऊ माल गिरणीमालकांनीं काढला पाहिजे. को-ऑपरेटिव्ह पद्धतीनें गिरण्यांच्या गटांनीं कापूस, स्टोअर्स, विक्री, वगैरे केल्यास पुष्कळ बचत होईल, व उत्पादन-खर्च कमी करतां येईल. तसा प्रयत्न होणें फार जरूरीचें आहे.

---

## अखिल भारतीय मधुमक्षिका पालक परिषद व प्रदर्शन, महाबळेश्वर

अखिल भारतीय मधुमक्षिका पालकसंघाचें वार्षिक अधिवेशन व मधुमक्षिका पालकांची परिषद महाबळेश्वर येथें मे १९५४ मध्यें दुसऱ्या आठवड्यांत भरण्याचें ठरलें आहे. याचवेळीं भारतांतल्या निरनिराळ्या राज्यांतून तेथील मधमाशांच्या वसाहती, त्यांचीं घरें, मधाचे नमुने, मधुरस देणाऱ्या वनस्पती व फुलें, मधुमक्षिका पालनावरील वाङ्मयाचें भव्य प्रदर्शनहि होईल. मुंबई राज्य ग्रामोद्योग समिति, महाराष्ट्र विभाग, ३६१, सदाशिव, पुणें यांच्यातर्फे परिषद व प्रदर्शन भरविलें जाणार आहे.

---

## मालेगांव सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास रिझल्ट

नासिक जिल्ह्यासाठीं भरलेल्या "सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास, मालेगांव" या क्लासचा परीक्षेचा रिझल्ट नुकताच लागला असून त्यांत परीक्षेस ५० विद्यार्थी बसले त्यांपैकीं ३७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यांत खालीलपैकीं पहिले ६ द्वितीय श्रेणींत आणि त्याखालील ३१ तृतीय श्रेणींत यशस्वी झालेले आहेत.

१ जा. पुं. पाटील, २. मा. ना. निंबाळकर, ३ ग. ने. पाटील, ४ ना. प. पाटील, ५ सि. रा. पाटील, ६ प्र. बा. कासार, ७ का. ग. कुलकर्णी, ८ गो. पं. जोशी, ९ के. सि. दीक्षित, १० व. ज. गुंजाळ, ११ ग. उ. शिंपी, १२ तो. बा. निकम, १३ का. गो. कुलकर्णी, १४ न. उ. सोनवणे, १५ दा. त्रिं. खैरनार, १६ बु. चिं. वाघ, १७ ना. चिं. शिंदे, १८ ना. स. हिरे, १९ प. ल. कुलकर्णी, २० मो. शा. नंदाळे, २१ दि. शं. निंबाळकर, २२ प्र. गो. पाटील, २३ पुं. मो. पाटील, २४ दा. गि. परदेशी, २५ ना. आ. पाटील, २६ गो. मो. सुतार, २७ आ. म. पाथरवट, २८. व. अं. हलवाई, २९ द. म. शिंदे, ३० गु. मा. बोरसे, ३१ ग. गो. पाटील, ३२ शं. स. पाटील, ३३ य. पुं. निकम, ३४ ह. श्री. सोनार, ३५ शा. बा. सूर्यवंशी, ३६ बा. ज. पाटील, ३७ मो. आ. पाटील.

एन्. वाय. कुलकर्णी,
को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग इन्स्पेक्टर, नासिक.

---

दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक, लि., पुणें २

# नोटीस

या बँकेची ४७ वी वार्षिक साधारण सभा रविवार, दि. २७ सप्टेंबर, १९५३ रोजीं सकाळीं ठीक ८-३० वाजतां नूतन मराठी विद्यालय इंग्रजी शाळेच्या सभागृहांत भरेल. त्यावेळीं पुढील कामें होतील.

१. दि. ३१ ऑगस्ट, १९५२ ला झालेल्या वार्षिक साधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणें.

२. सल्लागार मंडळ, कार्यकारी मंडळ व स्थानिक आयव्यय निरीक्षक यांच्या निवडणुकी आणि व्यवसायी आयव्यय निरीक्षक यांची सन १९५२-५३ व सन १९५३-५४ सालचे कामांसाठीं नेमणूक करणें.

३. सन १९५२-५३ चा वार्षिक वृत्तांत, ताळेबंद, लाभहानी पत्रक, लाभ विभागणी व पुढील वर्षाचा अर्थसंकल्प इत्यादि मान्य करणें.

४. मा. स्थानिक व व्यवसायी आयव्यय निरीक्षक यांजकडून आलेल्या वार्षिक तपासणी याद्या व त्यांस मा. कार्यकारी मंडळानें दिलेलीं उत्तरें यांची माहिती घेणें.

५. बुधवार, दि. १६ सप्टेंबर, १९५३ रोजीं अगर त्यापूर्वी बँकेच्या वेळांत बँकेच्या १० अगर जास्त सभासदांच्या स्वाक्षरीनें, नवीन मंजूर पोट नियम नं. ३४ प्रमाणें पोट नियमांचें दुरुस्तीविरहित, येणाऱ्या इतर सूचनांचा विचार करणें.

६. मा. कार्यकारी मंडळानें बँकेच्या पोट नियमांस सुचविलेल्या दुरुस्त्या अगर नवीन पोट नियम यांचा विचार करणें.

७. मा. अध्यक्ष यांच्या अनुज्ञेनें ऐनवेळीं येणाऱ्या विषयांचा विचार करणें.

ज्या सभासदांस वरील विषय क्रमांक २ यांतील निवडणुकीस कोणत्याहि एका गटांत उमेदवार म्हणून उभे रहावयाचें असेल त्यांनीं बँकेकडून उमेदवारीचा अर्ज ( सूचना पत्रक ) घेऊन तो मताधिकार असलेल्या बँकेच्या दोन सभासदांच्या सूचनेसह भरून व त्यांवर संमतीदर्शक स्वाक्षरी करून, नवीन मंजूर निवडणूक नियम नं. ३ प्रमाणें तो शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट, १९५३ ला सायंकाळीं ७ वाजेपर्यंत अगर त्यापूर्वी बँकेच्या कार्यालयांत मिळेल या बेतानें पाठवावा. त्यानंतर आलेल्या अशा अर्जांचा विचार केला जाणार नाहीं. उमेदवारीचे अर्ज ( सूचनापत्रक ) बँकेच्या कार्यालयांत दि. १ ऑगस्टपासून बँकेच्या वेळांत मिळतील.

या वार्षिक साधारण सभेस बँकेच्या सभासदांनीं अवश्य यावें. ज्या सभासदांचे पत्ते बदलले असतील त्यांनीं ते गुरुवार, दि. २७ ऑगस्ट १९५३ पर्यंत बँकेंत लेखी कळविण्याची कृपा करावी म्हणजे सदर पत्त्यांवर बँकेचा वार्षिक वृत्तांत इत्यादि पाठविणें सोईचें होईल.

पुणें २.
दि. २५ जुलै, १९५३.

मा. कार्यकारी मंडळाचे आज्ञेवरून,
य. श्री. शाळिग्राम.
कार्यवाह.

# स्वदेशी व जनता यांच्या समन्वयाची आवश्यकता

## श्री. श्री. वा. काळे यांनीं केलेलें सुस्पष्ट मार्गदर्शन

पुणें, दि. २०:— "महाराष्ट्राची अर्थव्यवस्था यापुढें वाढणाऱ्या कारखानदारीवर अवलंबून आहे आणि कारखानदारीची वाढ महाराष्ट्राच्या बँका वाढण्यावर अवलंबून आहे," असे उद्गार 'अर्थ'चे संपादक श्री. श्री. वा. काळे यांनीं येथील महाराष्ट्रपरिचय व्याख्यानमालेंत बोलतांना काढले. काल सायंकाळीं येथील कॉमनवेल्थच्या सभागृहांत हें भाषण झालें.

### वृत्तपत्रांबाबत तक्रार

भाषणाच्या प्रारंभीं त्यांनीं महाराष्ट्राच्या वृत्तपत्रांतून व वाचकवर्गाच्या अभिरुचींतून होणारें 'महाराष्ट्र-दर्शन' सांगितलें. ते म्हणाले, "महाराष्ट्राची अर्थव्यवस्था जर सुधारावयाची असेल तर तिच्याविषयीं जिज्ञासा उत्पन्न केली पाहिजे. आर्थिक घडामोडी, बाजारभाव, व्यापारी बातम्या, यांच्याविषयीं जिज्ञासा उत्पन्न झाली पाहिजे. ही जिज्ञासा निर्माण करण्याचें काम महाराष्ट्रांतील वृत्तपत्रांनीं केलें पाहिजे; परंतु वृत्तपत्रें हें काम करीत नाहींत असें दिसतें. आज वृत्तपत्रांतून अर्थकारणाला त्याचें योग्य तें स्थान दिलें पाहिजे. व्यापारी घडामोडी ही एक दुर्लक्षित बाब आहे. वृत्तपत्रांना या बाबतींत बरेंच काम करतां येईल."

देशांतील आर्थिक उलाढालींचा संबंध प्रत्येक कुटुंबाशीं येतो. तेव्हां प्रत्येक वाचकाला फौजदारी गुन्हे किंवा नटनटींचे समाचार यांच्याचप्रमाणें अर्थकारणाचें ज्ञानहि आवश्यक आहे. वृत्तपत्रांप्रमाणेंच व्यापारी वर्गानेंहि व्यापारी उलाढालींची माहिती करून घेतली पाहिजे. महाराष्ट्राचें अर्थकारण करणाऱ्या घटकांत व्यापाऱ्यांचें स्थान निश्चितपणें आहे परंतु त्यांनींसुद्धा अधिक अभ्यासपूर्वक या व्यवसायांत पडलें पाहिजे.

### 'जांवई' व्यापारी शोधा

मुंबईचा शेअर बाजार पहा, त्यांत एकाहि महाराष्ट्रीय कंपनीचें नांव नाहीं. सेल्स टॅक्सची चळवळ घ्या, त्यांत महाराष्ट्रीय नाहीं. मर्चंटस् चेंबर घ्या, त्यांत महाराष्ट्रीय दिसत नाहीं; वृत्तपत्रें व व्यापारी यांची अर्थकारणाबाबतची अशी स्थिति पाहिल्यानंतर महाराष्ट्रांत प्रतिष्ठा कोणाची असा विचार मनांत येतो तेव्हां असें दिसतें कीं,

महाराष्ट्रांत पैशाला प्रतिष्ठा नाहीं असें असल्यामुळेंच कदाचित् आपण अर्थकारणांत मागें पडत असूं. मुलगी कोणाला द्यावी असा विचार कोणी करावयाला लागला तर प्रथम पदवीधर नोकरपेशांतला पाहावा असें वाटतें; चटकन् व्यापारी पुढें येत नाहीं. सामाजिक प्रतिष्ठेचें हें एक गमक आहे.

तेव्हां, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सुधारावयाची असेल तर अर्थव्यवस्थेचे जे सामाजिक आधारस्तंभ त्यांना प्रतिष्ठा उत्पन्न झाली पाहिजे.

प्रचलित अर्थव्यवस्थेंतील अननुभवीपणा, नफेबाजी, आदि दोषांचें विवेचन करून श्री. काळे आपल्या भाषणांत म्हणाले, "महाराष्ट्राची यापुढील अर्थव्यवस्था ही कारखानदारीच्या सुधारणेवर व वाढीवर अवलंबून आहे; आणि कारखानदारीची वाढ ही भांडवल मिळण्यावर अवलंबून आहे. भांडवल मिळणें ही गोष्ट आज अवघड दिसते खरी, पण तें जमा केल्याशिवाय तरणोपाय नाहीं ही गोष्टहि खरी आहे.

### सुरक्षित बँकांची जरुरी

आज महाराष्ट्रांतले अनेक कारखानदार एकत्र केले तरी महाराष्ट्राच्या भावी अर्थव्यवस्थेला उपकारक असें आधारभूत भांडवल जमेल कीं नाहीं याची शंकाच वाटते. त्यावर उपाय एकच दिसतो तो म्हणजे शहरांत आणि खेड्यांतसुद्धा बँकांमार्फत आपले व्यवहार करण्याची संवय लोकांना लावणें, जें भांडवल व्यक्ति आणि दोन व्यक्ति उभारूं शकत नाहींत तेंच भांडवल बँक पुरवूं शकते म्हणून महाराष्ट्रांतील लोकांना बँकेची संवय जडली पाहिजे; कारण बँकेंत आपण एक रुपाया ठेवला तर तोच रुपाया बँकिंगच्या तत्त्वामुळें ८–९ वेळां वापरतां येतो व कारखानदारी वा व्यापार याला पुरेसें भांडवल मिळूं शकतें. शिवाय, बँकांची त्यांच्या कर्जदार कारखान्यांवर देखरेखहि चांगली राहूं शकते. या दृष्टीनें बँकांची संघटना सुदृढ असली पाहिजे. अधिक सुरक्षिततेच्या दृष्टीनें चांगल्या मातबर बँका असणें आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेंत हें द्विविध कार्य महत्त्वाचें मानलें पाहिजे."

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेंत स्वदेशीला फार मोठें स्थान द्यावें लागेल असें सांगून श्री. काळे म्हणाले, "महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेच्या प्रगतीसाठी स्वदेशीची भावना दृढमूल झाली पाहिजे. आपली स्वदेशीची कल्पना फार विशाल नाहीं असें कोणीं म्हटलें तरी तो आक्षेप पत्करून सुद्धा महाराष्ट्रीय कारखानदारीला उत्तेजन म्हणून महाराष्ट्रीय कारखान्यांतून तयार झालेला माल घेण्याचें व्रत आपण पाळलें पाहिजे. सरकारनें संरक्षण दिलें नाहीं तरी आपल्या धंद्यांना जनता संरक्षण देते अशी परिस्थिति झाली तर महाराष्ट्रीय अर्थव्यवस्थेला सुधारण्यास जागा आहे असें म्हणावें लागतें."

"स्वदेशी व जनता यांचे संबंध हे असे परस्परावलंबी आहेत; परंतु स्वदेशीबाबतची जबाबदारी कारखानदारांनीं घेतली पाहिजे; नाहीं तर महाराष्ट्रांतील स्वदेशी भावनेचा उपयोग करून घ्यावयाचा आणि महाराष्ट्रीय कारखानदारांनीं मात्र त्या पैशावर टाटा-बिर्लांच्या रांगेंत जाण्याची खटपट करावयाची, ही स्थिति स्पृहणीय नाहीं. महाराष्ट्रानें आपली कारखानदारी जोपासली तर महाराष्ट्रासाठी आपण कांहीं केलें पाहिजे अशी कारखानदारांची वृत्ति पाहिजे; नाहीं तर स्वतःच्या मालाचा उठाव व्हावा म्हणून स्वदेशीचा आग्रह धरणारे कारखानदार स्वतःच्या कारखान्यांत तरी सर्व माल स्वदेशी असावा अशी खटपट करतात कीं नाहीं याची चौकशी करावी लागेल. हें व्रत फक्त ग्राहकांनीं स्वीकारावें व कारखानदारांनीं मात्र तें सोयिस्करतेनें विसरावें ही गोष्ट योग्य नव्हे."

### महाराष्ट्राची विविध अर्थव्यवस्था

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचे शेती, व्यापार व कारखानदारी हे तीन घटक असल्याचें सांगून श्री. काळे म्हणाले, "महाराष्ट्राच्या शेतीपुढें भांडवल-पुरवठा हाच एक मोठा प्रश्न आहे. त्यासाठी सरकारी प्रयत्न, खाजगी प्रयत्न, त्याचप्रमाणें सहकारी प्रयत्नसुद्धां झाले पाहिजेत. विविध मार्गांनीं हा पुरवठा करतां येईल. व्यापारालासुद्धा, भागीदारी, कर्जपुरवठा, इत्यादि साहाय्याची आवश्यकता आहे. कारखानदारीलासुद्धा, स्थायी भांडवल, जमीन, कच्चा माल, पक्का माल, विक्री, या साऱ्यांसाठी भांडवलाची आवश्यकता आहे. आजचें भांडवल हें आपल्या त्यागांतूनच उभें राहील. आजचा महाराष्ट्र पोटाला चिमटा घेईल तर उद्यांच्या महाराष्ट्राचें आशादायी चित्र उभें

राहील. आजच्या त्यागावर भावी पिढीला मिळणारें साहाय्य व प्रेरणा अवलंबून आहे या गोष्टीची जाणीव ठेवून महाराष्ट्रानें दक्षता ठेवली पाहिजे. आपली बुद्धिमत्ता, निसर्गाची साधनसामग्री या गोष्टींचा यथायोग्य मेळ घालून धडाडीनें, अर्थकारणाला महत्त्व देऊन सहकार्य केलें तर उद्यांची अर्थव्यवस्था बळकट ठरेल; अन्यथा नाहीं.

योग्य ज्ञान, सचोटी, संयम, सहकार्य, धडाडी, यांच्या आधारें महाराष्ट्र अर्थकारण करील तर त्याला कोणत्याहि क्षेत्रांत धोका उरणार नाहीं."

—केसरी (पुणें पुरवणी) २१–७–५३

मद्रास सरकार म्हैसूरचें कर्ज घेणार—म्हैसूर सरकारच्या ४ टक्के दराच्या कर्जाचे ५ लाख रुपये किंमतीचे रोखे मद्रास सरकार घेणार आहे, असें म्हैसूर सरकारला मद्रास सरकारतर्फे कळविण्यांत आलें आहे.

**पौंडी गंगाजळीचा वापर–हिंदींत आणि इंग्रजींत करार**

नवी दिल्ली येथें भारत सरकार आणि ब्रिटिश सरकार यांचे दरम्यान पौंडी गंगाजळी मोकळी करण्यासंबंधीच्या आर्थिक करारावर २० जुलै रोजीं स्वाक्षऱ्या करण्यांत आल्या. भारत सरकारचे वतीनें अर्थमंत्री श्री. चिं. द्वा. देशमुख आणि ब्रिटिश सरकारचे वतीनें, त्या सरकारचे भारतांतील हंगामी हाय कमिशनर श्री. जी. एच. मिडलटन, यांनीं स्वाक्षऱ्या केल्या. सदरहू करार हिंदी आणि इंग्रजींत असून तो ३० जून, १९५७ अखेरपर्यंत अमलांत राहील.

पूर्व जर्मनीची नवी बोट—रॉस्टॉक येथें पूर्व जर्मनीची युद्धोत्तर पहिली मालवाहू बोट बांधण्यांत आली आहे. ही बोट मूळ रशिआसाठी बांधण्यांत आली; पण नंतर रशिआनें तीवरील आपला हक्क सोडून दिला. बोटीचें वजन ३,००० टन असून ती अगदीं आधुनिक पद्धतीची आहे. खलाशांना झोपण्यासाठीं खोल्या आहेत आणि एंजिनांत कोळसा घालण्याचें काम आपोआप चालणाऱ्या यंत्रांकडून होणार आहे.


दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.


आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.


एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

किर्लोस्कर

पॉवरवर चालणारे





वसंत नं. ३ चरक

"शरद चरक"

उसाचे चरक

हंगाम नजीक आला!

—सविस्तर माहितीसाठी आजच लिहा.—

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी (जि. द. सातारा)

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

(शिड्यूल्ड बँक)

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

पुणें २.

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००

जमा झालेलें भांडवल रु. ७,१९,४८५

खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. वा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर. श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.